20 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


दैनिक
# सृष्टी
मो. ९३७०४०९६९४
E-mail : dainiksrushti@gmail.com

# सकारात्मक अभिव्यक्तीतून माणूसपण घडते: डॉ. आलोक जत्राटकर

## शिवाजी विद्यापीठात शिक्षकांमध्ये कौशल्यवृद्धीसाठी बातमी लेखनविषयी व्याख्यान

सृष्टी वृत्तसेवा/ कोल्हापूर (प्रतिनिधी): सकारात्मक अभिव्यक्तीमधून माणूसपण घडत जाते आणि मानवतेच्या कक्षा रुंदावतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अंतर्गत शिक्षकांमध्ये गुणवत्ता व कौशल्यवृद्धीसाठी बातमीलेखन याविषयी डॉ. जत्राटकर यांचे काल (दि. १६) विशेष व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते.




राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षकांच्या सर्वांगीण विकासाला, कौशल्याधारित ज्ञानाला विशेष महत्व असल्याने कौशल्य विकास उपक्रम ांतर्गत सदर व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ.जत्राटकर म्हणाले, अभिव्यक्ती ही मानव असण्याची पूर्वअट आहे. त्यासाठी भोवतालामधून प्रेरणा घेऊन आपल्या वाचन, लेखन आदी अभिव्यक्तीच्या दिशा शोधाव्या लागतात. अनुभव आणि सातत्य यामधून ही कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. बातमी लेखन ही एक शैलीदार कला असून हे कौशल्य प्रत्येकाला सरावातून विकसित करता येते. यावेळी त्यांनी संज्ञापन, बातमीलेखन, वार्तामूल्ये, लेखनाचे प्रकार, बहुमाध्यमी बातमीचे स्वरुप इत्यादींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ.नितीन रणदिवे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ.सचिन भोसले यांनी परिचय करून दिला. संदीप थिटे यांनी सूत्रसंचालन केले, तर, डॉ. नगीना माळी यांनी आभार म ानले. कार्यक्रमास उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक डॉ.चांगदेव बंडगर यांच्यासह सर्व समन्वयक, सहायक प्राध्यापक आणि कोर्स कॉर्डिनेटर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 0 JAN 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ संघ पात्र

## अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धा : मार्च महिन्यात केरळमध्ये होणार स्पर्धा

- **प. वि. क्रिकेट स्पर्धेत भोपाळच्या टागोर विद्यापीठाला केले पराभूत**

प्रतिनिधी
कोल्हापूर

कालिकत विद्यापीठात (केरळ) मार्च महिन्यात होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघ सलग पाचव्यांदा पात्र ठरला आहे. या संघाने बनस्थळी विद्यापीठातील (राजस्थान) मैदानात सुरु असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेतील पात्रता फेरीच्या सामन्यात भोपाळ (मध्यप्रदेश) येथील रविंद्रनाथ टागोर विद्यापीठ संघावर १२ धावांनी विजय मिळवला. या विजयामुळेच शिवाजी विंद्यापीठ संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.



**कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ महिला क्रिकेट स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठ महिला संघासोबत संघ व्यवस्थापक प्रा. डॉ. सुरेश फराकटे, शारीरिक शिक्षण संचालक देवदत्त महात्मे.**

गतवर्षी झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेतील पात्रता फेरीमधील सामना शिवाजी विद्यापीठ संघाने जिंकला होता. त्यामुळे बनस्थळी येथे सुरु असलेल्या पश्चिम विभागीय स्पर्धेतून अखिल भारतीय आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठीच्या खेळवल्या जाणाऱ्या पात्रता फेरीतील सामना थेट खेळण्याची संधी शिवाजी विद्यापीठ संघाला मिळाली होती. त्यानुसार शिवाजी विद्यापीठ संघ व रवींद्रनाथ टागोर विद्यापीठ संघ यांच्यात पात्रता फेरीचा सामना झाला.

या सामन्यासाठी प्रथम फलंदाजी करताना शिवाजी विद्यापीठ संघाने १५ षटकात ६ बाद ९५ धावा केल्या होत्या. यामध्ये कर्णधार क्रिशी ठक्करने ३४, अक्षता नरतवडेकरने १८, संस्कृती राठोडने १६ धावांचे योगदान दिले. प्रत्युत्तरादाखल खेळलेल्या टागोर विद्यापीठाने १५ षटकात ५ बाद ८३ धावाच केल्या. त्यामुळे या संघावर शिवाजी विद्यापीठ संघाचा १२ धावांनी विजय झाला. तसेच विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्रही ठरला. विद्यापीठाच्या संघाचा सामना जिंकून देण्यात मोलाचा वाटा उचललेल्या क्रीशी ठक्कर, आकांक्षा राजणे, स्नेहल टकले, आर्पिती नायकवडी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

विद्यापीठाच्या संघाला प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ व्ही. एन. शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे संघ व्यवस्थापक प्रा. सुरेश फराकटे आणि प्रा. देवदत्त महात्मे, प्रा. सुचय खोपडे, प्रा. प्रफुल मांगोरे पाटील, प्रा. श्वेता परुळेकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

**पात्र ठरलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ :** क्रिशी ठक्कर (कर्णधार), अक्षता नतरवडेकर, सानिका पाटील, रसिका शिंदे, सृष्टी पोवार, ऋतुजा घबक, स्नेहल टकले, संस्कृती राठोड, अर्पिता नायकवडी, आकांक्षा राजने, वैदेही जोशी, श्रेया जेऊर, अनुजा खंडागळे, ऋतिका चतुरे, मिसबा सय्यद प्राजक्ता घाटगे.

20 JAN 2026

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimati Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# सकारात्मक अभिव्यक्तीतून माणूसपण घडते : डॉ. आलोक जत्राटकर

**कोल्हापूर, (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज) :**

सकारात्मक अभिव्यक्तीमधून माणूसपण घडत जाते आणि मानवतेच्या कक्षा रुंदावतात, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील अंतर्गत शिक्षकांमध्ये गुणवत्ता व कौशल्यवृद्धीसाठी बातमीलेखन याविषयी डॉ. जत्राटकर यांचे काल (दि. १६) विशेष व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षकांच्या सर्वांगीण विकासाला, कौशल्याधारित ज्ञानाला विशेष महत्व असल्याने कौशल्य विकास उपक्रमांतर्गत सदर व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ.जत्राटकर म्हणाले, अभिव्यक्ती ही मानव असण्याची पूर्वअट आहे. त्यासाठी भोवतालामधून प्रेरणा घेऊन आपल्या वाचन, लेखन आदी अभिव्यक्तीच्या




दिशा शोधाव्या लागतात. अनुभव आणि सातत्य यामधून ही कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. बातमी लेखन ही एक शैलीदार कला असून हे कौशल्य प्रत्येकाला सरावातून विकसित करता येते. यावेळी त्यांनी संज्ञापन, बातमीलेखन, वार्तामूल्ये, लेखनाचे प्रकार, बहुमाध्यमी बातमीचे स्वरुप इत्यादींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ.नितीन रणदिवे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ.सचिन भोसले यांनी परिचय करून दिला. संदीप थिटे यांनी सूत्रसंचालन केले, तर, डॉ. नगीना माळी यांनी आभार मानले. कार्यक्रमास उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक डॉ.चांगदेव बंडगर यांच्यासह सर्व समन्वयक, सहायक प्राध्यापक आणि कोर्स कॉर्डिनेटर उपस्थित होते.

20 JAN 2026

पुण्यनगरी

# 'प्रतिसरकारची चळवळ...' विषयावर आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये मराठी विभागातील क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासनाच्या वतीने 'प्रतिसरकारची चळवळ आणि जी. डी. (बापू) लाड' या विषयावर व्याख्यान दि. २० रोजी होणार आहे. या विषयावर विचारवंत अरुण खोरे, पुणे हे संवाद साधणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असतील. हे व्याख्यान विद्यापीठातील गणित विभागात रामानुजन सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता सुरू होईल.

जनसंपर्क कक्ष

20 JAN 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाकडून ५६७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील ५६७ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी डिप्लोमा इन टॅक्सेशन, बीटेक एमसीए, बॅचलर ऑफ फार्मसी, एमटेक, बीबीए, एमबीए (इंटिग्रेटेड), बीसीए, डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी अशा ६२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने ८७ केंद्रांवर झाल्या. परीक्षेला १५,७१९ विद्यार्थी उपस्थित होते. सोमवारी बीटेक, एमएस्सी (गणित), बीए, बीएड, फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, बीकॉम, एमएस्सी, बायोकेमेस्ट्री आदी ३२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

2 0 JAN 2026

सकाळ

# विद्यापीठात उद्या 'बोलींचा जागर'

कोल्हापूर : शासनाच्या भाषा संचालनालय विभागातर्फे मराठी भाषेतील बोलींचे जतन व संवर्धन करण्यासाठी 'बोलींचा जागर' हा कार्यक्रम बुधवारी (ता. २१) शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात होणार आहे. त्यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील बोलींच्या अनुषंगाने मांडणी केली जाणार आहे. 'चंदगडी बोली : उद्‍गम आणि विकास' या विषयावर डॉ. नंदकुमार मोरे, तर 'चंदगडी बोलीचे स्वरूप' या विषयावर डॉ. गोपाळ गावडा मांडणी करणार आहेत. 'कोल्हापुरी बोली' या विषयावर डॉ. एकनाथ आळवेकर मांडणी करतील, अशी माहिती मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

20 JAN 2026

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# शिवाजी विद्यापीठात उद्या 'बोली भाषां'चा जागर

कोल्हापूर : शासनाच्या भाषा संचालनालय विभागामार्फत दरवर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो. या अंतर्गत मराठी भाषेतील बोलींचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने शिवाजी विद्यापीठात बुधवार, दि. २१ रोजी बोलींचा जागर कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. कार्यक्रमात कोल्हापूर जिल्ह्यातील बोलींच्या अनुषंगाने मांडणी केली जाणार आहे.

यामध्ये 'चंदगडी बोली : उद्गम आणि विकास' या विषयावर डॉ. नंदकुमार मोरे मार्गदर्शन करतील. 'चंदगडी बोलीचे स्वरूप" या विषयावर डॉ. गोपाळ गावडे, कोल्हापूरी बोली या विषयावर डॉ. एकनाथ आळवेकर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. भाषा संचालनालयाचे संचालक अरूण गीत यांची प्रमुख उपस्थित असेल. कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

20 JAN 2026

तरुण भारत

# वि. स. खांडेकर जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातर्फे गुरुवार, दि. २२ रोजी वि. स. खांडेकर यांच्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. वि. स. खांडेकर यांचा ध्येयवाद पराभूत झाला आहे काय? या विषयावर संपादक विनोद शिरसाठ मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बी. एम. हिर्डेकर असणार आहेत. विद्यापीठातील गणित विभागाच्या रामानुजन सभागृहात सकाळी ११ वा. व्याख्यानाला सुरुवात होणार आहे. यावेळी डॉ. अनंत लाभसेटवार व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. यासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

20 JAN 2026

तरूण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

## 'शहाजी' मध्ये 'हायकोर्ट प्रॅक्टिस' अभ्यासक्रमाला आजपासून प्रारंभ

कोल्हापूर : शहाजी लॉ कॉलेजमध्ये 'सर्टिफिकेट कोर्स इन हायकोर्ट प्रॅक्टिस'' हा नवीन अभ्यासक्रम सुरू होत आहे. या अभ्यासक्रमाचा प्रारंभ आज मंगळवार दि. २० रोजी कोल्हापूर खंडपीठातील चारही न्यायाधीश न्यायमूर्ती राजेंद्र अवचट, न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी, न्यायमूर्ती वृषाली जोशी, न्यायमूर्ती अजित बी. कडेठाणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रवीण पाटील यांनी दिली आहे. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेजमधील प्रा. पुष्पा देशपांडे-राशिवडेकर हॉलमध्ये सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य अॅड. वैभव पेडणेकर, सदस्य अॅ ड. अमित बाडकर, अभ्यासक्रम समन्वयक सुहास पत्की, माजी विद्यार्थी असोसिएशन अध्यक्ष अॅड. डॉ. संतोष शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

20 JAN 2026

तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# 'शहाजी' मध्ये 'हायकोर्ट प्रॅक्टिस' अभ्यासक्रमाला आजपासून प्रारंभ

**कोल्हापूर :** शहाजी लॉ कॉलेजमध्ये 'सर्टिफिकेट कोर्स इन हायकोर्ट प्रॅक्टिस" हा नवीन अभ्यासक्रम सुरू होत आहे. या अभ्यासक्रमाचा प्रारंभ आज मंगळवार दि. २० रोजी कोल्हापूर खंडपीठातील चारही न्यायाधीश न्यायमूर्ती राजेंद्र अवचट, न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी, न्यायमूर्ती वृषाली जोशी, न्यायमूर्ती अजित बी. कडेठाणकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. प्रवीण पाटील यांनी दिली आहे. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉमर्स कॉलेजमधील प्रा. पुष्पा देशपांडे–राशिवडेकर हॉलमध्ये सायंकाळी पाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे. यावेळी कौन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम, उपाध्यक्ष प्रसाद मगदूम, सचिव डॉ. विश्वनाथ मगदूम, सदस्य ॲड. वैभव पेडणेकर, सदस्य ॲ ड. अमित बाडकर, अभ्यासक्रम समन्वयक सुहास पत्की, माजी विद्यार्थी असोसिएशन अध्यक्ष ॲड. डॉ. संतोष शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

20 JAN 2026

जनप्रवास

# विद्यापीठात आज प्रतिसरकारची चळवळ विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये मराठी विभागातील क्रांतिअग्रणी जी. डी. (बापू) लाड अध्यासनाच्या वतीने 'प्रतिसरकारची चळवळ आणि जी. डी. (बापू) लाड' या विषयावर व्याख्यान आज (दि. २०) होणार आहे. 'प्रतिसरकारची चळवळ आणि जी. डी. (बापू) लाड' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत अरुण खोरे मार्गदर्शन करणार आहे. अध्यक्षस्थान कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे भूषवणार आहेत. हे व्याख्यान रामानुजन सभागृह, गणित विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या ठिकाणी गणित विभागात सकाळी ११ वाजता होणार आहे.

20 JAN 2026

सकाळ

# विनोद शिरसाठ यांचे गुरुवारी व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मराठी विभागातर्फे वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमाला घेतली जाते. याअंतर्गत गुरुवारी (ता. २३) सकाळी अकरा वाजता साधना साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ यांचे 'वि. स. खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झाला आहे काय?' या विषयावर व्याख्यान होणार आहे.

20 JAN 2026

जनप्रवास

न्यूज शॉर्ट्स

## विद्यापीठात गुरुवारी वि. स. खांडेकर जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाध्ये वि. स. खांडेकर जयंती व्याख्यानमाला मराठी विभागाच्या वतीने २२ जानेवारी रोजी साजरी केली जाणार आहे. या व्याख्यानमालेत 'वि. स. खांडेकरांचा ध्येयवाद पराभूत झाला आहे काय?' या विषयावर विनोद शिरसाठ यांचे व्याख्यान होणार आहे. अध्यक्षस्थान डॉ. बी. एम. हिर्डेकर भूषवणार आहेत. हे व्याख्यान गणित अधिविभागातील रामानुजन सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. डॉ. अनंत लाभसेटवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित राहणार आहेत. तरी कार्यक्रमासाठी रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी विभागाचे विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

20 JAN 2026
तरुण भारत

# विद्यापीठात आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील जी. डी. लाड अध्यासनाच्यावतीने 'प्रतिसरकारची चळवळ व जी. डी. लाड' या विषयावर आज व्याख्यान होणार आहे. ज्येष्ठ लेखक अरुण खोरे मार्गदर्शन करणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी असणार आहेत. विद्यापीठाच्या गणित विभागातील रामानुजन सभागृहात सकाळी ११ वा. व्याख्यान सुरू होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 JAN 2026 पुण्यनगरी

# गांधी, नेहरू, आंबेडकरांकडून व्यापक भारताची संकल्पना

## – अरुण खोरे

कोल्हापूर : प्रतिनिधी

देशाच्या उत्थानासाठी कार्य करण्याचे मार्ग वेगळे असले तरी गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांचे भारताच्या व्यापक उभारणीचे उद्दिष्ट मात्र एकच होते. ते साध्य करण्यासाठी त्यांनी संघर्षातून समन्वयात्मक संवादाचा मार्ग स्वीकारला. त्यातून सर्वसमावेशक भारताची संकल्पना साकारली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत अरुण खोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'महात्मा गांधी- डॉ. बाबासाहेब आंबेडकर- पंडित जवाहरलाल नेहरू : एक संवाद' या विषयावर त्यांचे विशेष व्याख्यान झाले. ते म्हणाले, गांधी आणि नेहरू, आंबेडकर यांच्यामध्ये एका पिढीचे अंतर होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये काही बाबतीत मतभेद होत असत. नेहरूंसाठी गांधी नेहमीच पित्यासमान राहिले. गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना आणि नेहरूंचा आधुनिकतावादी दृष्टिकोन यामध्ये अंतर असले तरी गांधींच्या रचनात्मक कार्याला नेहरूंचे सदैव सहकार्य राहिले. गांधीजी आणि डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये जातीय निवाड्यावरून आमरण उपोषणापर्यंत संबंध ताणले गेले तरी, या दोघांच्या संवादात खंड पडला नाही. घटना समितीमध्ये आंबेडकरांचा प्रवेश ही गांधी-आंबेडकरांच्या सुसंवादाची नवी सुरुवात होती. अध्यक्षीय मनोगतात डॉ. रणधीर शिंदे यांनी, तत्कालीन परिस्थितीमध्ये गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांच्यासमोरील अग्रक्रमाचे मुद्दे वेगवेगळे होते; पण राष्ट्रनिर्मितीचे ध्येय मात्र समान होते, असे सांगितले.

प्रास्ताविक डॉ. प्रकाश पवार सूत्रसंचालन मतीन शेख यांनी केले. सोनाली जाधव यांनी आभार मानले. शोभा खोरे, डॉ. सुनीलकुमार लवटे, व्यंकाप्पा भोसले, दशरथ पारेकर, जयसिंग पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित विशेष व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत अरुण खोरे. सोबत मान्यवर.

20 JAN 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'गांधी, आंबेडकर, नेहरूंमुळे सर्वसमावेशक भारत साकार'

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशाच्या उन्नतीसाठी कार्य करण्याचे मार्ग वेगळे असले तरी महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वसमावेशक भारताची संकल्पना साकारली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत अरूण खोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू : एक संवाद या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते.

खोरे म्हणाले, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये एका पिढीचे अंतर होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये काही बाबतीत मतभेद होत असत. तरीही गांधी, नेहरूंमध्ये एक वेगळे अद्वैत होते. नेहरूंसाठी गांधी नेहमीच पित्यासमान राहिले. गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना आणि नेहरूंचा आधुनिकतावादी दृष्टीकोन यामध्ये अंतर असले तरी गांधींच्या रचनात्मक कार्याला नेहरूंचे सदैव सहकार्य राहिले. गांधी – नेहरू – आंबेडकर यांनी अखिल भारतीय समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे स्वप्न पाहिले. त्या उद्दिष्टपूर्तीचे त्यांचे मार्ग वेगळे असले तरी देशातील बहुजन, वंचित, दलित घटकांच्या उन्नतीची तळमळ मात्र सारखीच होती. भारतीयत्व निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांचा समन्वयात्मक संवाद हा उच्च दर्जाचा होता. त्याची फळे आजही आपण चाखत आहोत. या त्रयीने देशाच्या निर्मितीच्या कालखंडात घेतलेल्या भूमिकांचा समग्र आणि साकल्याने विचार करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत अरूण खोरे. बाजूस डॉ. प्रकाश पवार, डॉ. रणधीर शिंदे.**

सोनाली जाधव यांनी आभार मानले. यावेळी शोभा खोरे, डॉ. सुनीलकुमार लवटे, व्यंकाप्पा भोसले, दशरथ पारेकर, जयसिंग पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

20 JAN 2026

जनप्रवास

# संघर्षातून सर्वसमावेशक भारताची संकल्पना साकार

## ज्येष्ठ विचारवंत अरुण खोरे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठाच्या गांधी अभ्यास केंद्रातर्फे व्याख्यान

**जनप्रवास : कोल्हापूर**

देशाच्या उत्थानासाठी कार्य करण्याचे मार्ग वेगळे असले तरी गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांचे भारताच्या व्यापक उभारणीचे उद्दिष्ट मात्र एकच होते. ते साध्य करण्यासाठी त्यांनी संघर्षातून समन्वयात्मक संवादाचा मार्ग स्वीकारला. त्यातून सर्वसमावेशक भारताची संकल्पना साकारली, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत अरुण खोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे गांधी अभ्यास केंद्र आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'महात्मा गांधी- डॉ. बाबासाहेब आंबेडकर- पंडित जवाहरलाल नेहरूः एक संवाद' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना ज्येष्ठ विचारवंत अरुण खोरे. सोबत डॉ. प्रकाश पवार, डॉ. रणधीर शिंदे.

खोरे म्हणाले, गांधी आणि नेहरु, आंबेडकर यांच्यामध्ये एका पिढीचे अंतर होते. त्यामुळे त्यांच्यामध्ये काही बाबतीत मतभेद होत असत. तरीही गांधी, नेहरूंमध्ये एक वेगळे अद्वैत होते. नेहरूंसाठी गांधी नेहमीच पित्यासमान राहिले. गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना आणि नेहरूंचा आधुनिकतावादी दृष्टिकोन यामध्ये अंतर असले तरी गांधींच्या रचनात्मक कार्याला नेहरूंचे सहकार्य राहिले. गांधीजी आणि डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये मात्र हिंदू धर्मातील वर्णाश्रम पद्धती, जातीभेद यांवरुन मोठे मतभेद होते. गांधी आहे त्या घरात राहून सुधारणा करण्याच्या मताचे होते. तर, अथक प्रयत्नांनंतरही ते घर दुरुस्त होत नसेल तर त्याची संपूर्ण फेरबांधणी करावी, असे डॉ. आंबेडकर यांचे मत होते. जातीय निवाड्यावरुन आमरण उपोषणापर्यंत हे संबंध ताणले गेले. या दोघांच्या संवादात खंड पडला नाही. घटना समितीमध्ये आंबेडकर यांचा प्रवेश ही गांधी-आंबेडकरांच्या सुसंवादाची नवी सुरुवात होती. या देशातील अखिल महिलांच्या कल्याणाचा विचार करणारे हिंदू कोड बिल जसेच्या तसे लागू करण्याच्या मताचे आंबेडकर होते. पण काँग्रेसजनांच्या मानसिकतेची पूर्ण जाणीव असलेल्या नेहरुंनी ते टप्प्याटप्प्याने लागू करण्याचे विचार मांडला. गांधी-नेहरू-आंबेडकर यांनी समाजाच्या सर्वांगीण प्रगतीचे स्वप्नपूर्तीसाठी प्रयत्न केले.

अध्यक्षस्थानावरून डॉ. शिंदे म्हणाले, तत्कालीन परिस्थितीमध्ये गांधी, नेहरू आणि आंबेडकर यांच्यासमोरील अग्रक्रमाचे मुद्दे वेगवेगळे होते. पण राष्ट्रनिर्मितीचे ध्येय मात्र समान होते. शोषणाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनही वेगळा होता. आज या महामानवांच्या विचारांना संकुचित आणि बंदिस्त करण्याचे प्रयत्न विविध स्तरांवर सुरू आहेत. ते उल्लंघून त्याच्याकडे पुन्हा नव्याने पाहणे आवश्यक आहे. डॉ. प्रकाश पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. मतीन शेख यांनी सूत्रसंचालन केले. सोनाली जाधव यांनी आभार मानले. यावेळी शोभा खोरे, डॉ. सुनीलकुमार लवटे, व्यंकाप्पा भोसले, दशरथ पारेकर, जयसिंग पाटील, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. आलोक जत्राटकर होते.

20 JAN 2026

जनप्रवास

# विद्यापीठात उद्या बोली भाषेचा जागर



कोल्हापूर : महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालय विभागामार्फत दरवर्षी मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो. या निमित्त मराठी भाषेतील बोलींचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने 'बोलींचा जागर' हा कार्यक्रम उद्या (दि.२१) मराठी विभागामध्ये होणार आहे. 'चंदगडी बोली : उद्गम आणि विकास' या विषयावर डॉ. नंदकुमार मोरे तर 'चंदगडी बोलीचे स्वरुप' या विषयावर डॉ. गोपाळ गावडे मार्गदर्शन करणार आहेत. तसेच 'कोल्हापुरी बोली' या विषयावर डॉ. एकनाथ आळवेकर मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थान कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे भूषवणार आहेत. भाषा संचालनालयाचे संचालक अरुण गीते उपस्थित राहणार आहेत. तरी कार्यक्रमासाठी रसिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

२० JAN 2026
सकाळ



कोल्हापूर : मराठी अधिविभागात 'लेखक संवाद' या कार्यक्रमात बोलताना प्रा. श्यामसुंदर मिरजकर. शेजारी प्रा. नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे आदी.

# कविता स्वतःकडे दुसऱ्याच्या नजरेने पाहायला शिकवते : प्रा. मिरजकर

कोल्हापूर, ता. १९ : कविता ही मानवतेची सर्वात सुंदर परिभाषा आहे. कविता स्वतःकडे दुसऱ्याच्या नजरेने पाहायला शिकवते. कविता केवळ शब्दांचा खेळ नसतो, तर घटना आणि अनुभूतीला संवेदनशीलतेची जोड मिळाल्याने उत्तम कवितेची निर्मिती होते, असे मत प्रा. श्यामसुंदर मिरजकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग येथे 'लेखक संवाद' यात ते बोलत होते. प्रा. नंदकुमार मोरे प्रमुख उपस्थित होते. कवितेमुळे समाजात जगताना माणूस म्हणून विचार करता येतो. कवीची प्रगती जाती-धर्माच्या भिंतीत होत नाही. त्यासाठी त्याला सामाजिक व्हावे लागते. हा विकास वाचनातून होतो. वाचन हे अंधारून आलेल्या काळात उजेडासारखे असते. फुलून येणाऱ्या क्षणांची सोबत असते. हे सर्व कवितेमुळे लक्षात येते. खरेतर जीवनाचा तोल सांभाळण्याचे काम कविता करत असल्याचे प्रा. मिरजकर यांनी सांगितले. त्यांनी 'इचलकरंजी कविता', 'दुखणं' व 'एक सेल्फी मित्रासोबत' या कविता सादर केल्या. डॉ. सुखदेव एकल, विद्यार्थी उपस्थित होते. ऋणाली नांद्रेकर यांनी आभार मानले. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले.